सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन,बीड-431122

खंडेश्वरी मंदीराजवळ,नाथापुर रोड,बीड
दुरध्वनी क्रमांक-2442-222603, 222609,फॅक्स-2442/222603
( DTE CODE-2011) Mail-office.gpbeed@dtemaharashttra.gov.in (MSBTE CODE-032)

जा.क्र शातंबी/विवि/2020/29 दिनांक 04/01/2021

महत्वाची सुचना

विषयः- हिवाळी परिक्षा 2020 चे ऑनलाईन (Online) परिक्षा फॉर्म भरणे बाबत.
( नियमीत व अनुउत्तीर्ण झालेल्या सर्व शाखेतील सर्व सत्राच्या व वर्षाच्या विद्यार्थ्यासाठी )

संदर्भः- जा.क्र मरातंशि/का-४३ /हि.प.2020/परीक्षा अर्ज/2020-21/००१ दि.०१-०१-२०२१

संस्थेतील नियमीत व अनुउत्तीर्ण झालेल्या सर्व विधार्थ्याना सुचीत करण्यांत येते की, घेण्यात येणा-या हिवाळी परीक्षा 2020 साठी नियमीत व अनुउत्तीर्ण झालेल्या सर्व शाखेतील सर्व सत्रातील / वर्षाच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन (Online) परीक्षा फॉर्म भरण्याकरिता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (www.msbte.com) या संकेत स्थळावर लिंक उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. त्यानुसार नियमीत व अनुउत्तीर्ण झालेल्या सर्व शाखेतील सर्व सत्राच्या / वर्षाच्या विद्यार्थ्यांनी (Online) परिक्षा फॉर्म विहीत कालावधीत भरुन घ्यावेत

| अ.क्र. | वर्षे/ सर्व शाखा | नियमीत परिक्षा शुल्क | नियमीत शुल्काचा कालावधी | विलंब शुल्क | विलंब शुल्काचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | First ,Second & Third Year | 600/- | दि.05.01.2021 ते दि..10/01/2021 | 800 | दि. 12.01.2021 ते दि. 13.01.2021 |

१. विद्यार्थ्यांनी मंडळाच्या (www.msbte.com) या संकेत स्थळावर Candidate Login मधुन ऑनलाईन (Online) परीक्षा फॉर्म अचूक विषयासह भरून स्वतःची स्वाक्षरी करावी.
२. Candidate Login मधुन कन्फर्मेशन केलेल्या फॉर्मची प्रिंट घेवून विद्यार्थी विभागाकडून शुल्काची नोंद घेवून सदर फॉर्म रोखा विभागात शुल्कासह जमा करावा.
३. विद्यार्थ्यांने शुल्काचा भरणा केल्यानंतर संस्थेच्या Institute Login मधुन कन्फर्मेशन करण्यांत येईल. त्यानंतर मंडळाच्या पावती क्रमांकासह कन्फर्मेशन झालेली प्रिंट साधारण पणे तीन दिवसानंतर विद्यार्थ्यास काढून घेता येईल.
४. परिक्षा शुल्क भरुन तीन दिवसानंतरही मंडळाच्या पावती क्रमांकासह कन्फर्मेशन झालेली प्रिंट विद्यार्थ्यास Candidate Login मधुन निघत नसल्यास विद्यार्थी विभागाशी त्वरित भेटावे. त्यांनतर आल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. त्यास सर्वस्वी संबधित विद्यार्थी जबाबदार राहील.
५. विद्यार्थ्यांने Institute कन्फर्मेशनची प्रत परिक्षेचे हॉल तिकीट प्राप्त होईपर्यंत स्वतः जवळ जतन करुन ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. परिक्षा फॉर्म भरतेवेळी काही आडचणी आल्यास विद्यार्थी विभागास भेटावे.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन बीड

**प्रत :-** 1) मुख्य सूचना फलक
2) रोखपाल यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव
3) प्रोग्रामर यांना माहिती व पुढील कार्यवाहिस्तव

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२११०/१८८/१३२

Email: secretary@msbte.com Web : www.msbte.org.in

जा. क्र. मरातंशिमं/का-४३/हि.प.२०२०/परीक्षा अर्ज/२०२०-२१/ 001 दिनांक – 01 JAN 2021

**नुतनवर्ष २०२१ च्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!**

**महत्त्वाचे परिपत्रक**

**विषय: हिवाळी परीक्षा-२०२० चे परीक्षा अर्ज भरणेबाबत महत्वाच्या सुचना.**

संदर्भ: मंडळाचे शैक्षणिक वेळापत्रक २०२०-२१ क्र. MSBTE/D-40/AcademicCalender/B2/ 2020/107, Dt. 08/12/2020

उपरोक्त संदर्भानुसार मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे वेळापत्रक प्रदर्शित केले आहे. त्यामध्ये हिवाळी-२०२० परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणेबाबतचा कालावधी नमूद केलेलाआहे. तरी या परिपत्रकाद्वारे विद्यार्थी, संस्था व विभागीय कार्यालय यांना हिवाळी -२०२० परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करण्याकरीता महत्त्वाच्या सूचना देण्यात येत आहेत.

**अ) हिवाळी परीक्षा-२०२० परीक्षा अर्ज भरतांना विद्यार्थ्यांकरीता सुचना.**

१. विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज Candidate Login मध्ये उपलब्ध असून त्यांनी परीक्षा अर्जात स्वतःचा **अचूक मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी** भरावा जेणेकरुन परीक्षाविषयक माहिती देण्याकरीता मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडीचा वापर करता येईल.

२. मंडळाचे कॅरी फॉरवर्ड योजनेअंतर्गत प्रवेशाबाबतच्या दि. १३/०८/२०२० व दि. ०८/१२/२०२०च्या परिपत्रकानुसार ज्या विद्यार्थ्यांनी कॅरी फॉरवर्ड Regirstration विभागीय कार्यालयामार्फत निश्चित केले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे पुढील सत्राकरीताचे नियमित परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

३. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी जुन्या अभ्यासक्रमातील (O/N/R/S/A/C/E/G) Scheme मधून पुढील सत्राकरिता नवीन अभ्यासक्रमातील Scheme मध्ये प्रवेश घेतला असल्यास अशा विद्यार्थ्यांचे नवीन Scheme नुसार पुढील सत्राकरिता परीक्षा अर्ज उपलब्ध नसतील. याकरिता विद्यार्थ्यांना Scheme Change Eligiblity घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या संस्थेशी संपर्क साधून पात्रता प्रमाणपत्राकरीताचे शुल्क संस्थेकडे अदा करावे. संस्थेने विभागीय कार्यालयामार्फत पात्रता प्रमाणपत्र निश्चित केल्यानंतरच पुढील सत्रातील नवीन Scheme नुसार परीक्षा अर्ज उपलब्ध होतील.

४. ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये **संस्थाबदल/अभ्यासक्रम बदल** केला असल्यास अशा विद्यार्थ्यांचे जुन्या संस्थेमध्ये/ जुन्या अभ्यासक्रमानुसार हिवाळी परीक्षा २०२० करिता परीक्षा अर्ज उपलब्ध असतील. मात्र अशा विद्यार्थ्यांनी सदर परीक्षा अर्ज न भरता Institute Change/ Programme Change पात्रता प्रमाणपत्र (Certificate of Eligibility) **घेणे आवश्यक** आहे. याबाबत विद्यार्थ्यांनी आपल्या संस्थेशी संपर्क साधून पात्रता प्रमाणपत्र करीताचे शुल्क संस्थेकडे अदा करावे. संस्थेने विभागीय कार्यालयामार्फत पात्रता प्रमाणपत्र निश्चित केल्यानंतरच नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रमानुसार परीक्षा अर्ज उपलब्ध होतील.

५. ज्या विद्यार्थ्यांचे या पूर्वीच्या परीक्षेदरम्यानचे गैरप्रकार / कॉपीकेस बाबतची शिक्षा पूर्ण झाली आहे अशा विद्यार्थ्यांनी हिवाळी परीक्षा-२०२० करीता परीक्षा अर्ज भरण्याकरीता आपल्या संस्थेशी संपर्क करावा.

६. पाचव्या व सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी, ज्या अभ्यासक्रमात Optional / Elective विषय देण्यात आलेले आहेत त्यापैकी ज्या Optional/Elective विषयाचे सत्रकर्म (Term Work) पूर्ण केले आहे तोच विषय परीक्षा अर्जात नमूद करावा.

७. शैक्षणिक वेळापत्रक २०२०-२१ मध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीत परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. परीक्षा अर्ज भरतांना काही अडचण निर्माण झाल्यास संस्थेशी संपर्क साधावा.

८. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क भरणेकरीता संस्थेशी संपर्क साधून ऑनलाईन अथवा प्रचलित पद्धतीने संस्थेमध्ये शुल्क अदा करावे व संस्थेने आपला परीक्षा अर्ज निश्चित केला आहे याची खात्री करुन घ्यावी.

९. बंद असलेल्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून हिवाळी-२०२० परीक्षा अर्ज भरण्याची व निश्चित करण्याबाबतची कार्यवाही मंडळाने नमूद केलेल्या विहित कालावधीतच करावी.

**ब) विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२० परीक्षा अर्ज निश्चित करण्याबाबतच्या संस्थांकरीता सूचना.**

१. संस्थांनी विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२० परीक्षेकरीता पात्रता प्रमाणपत्राकरीता आवश्यक असलेले कागदपत्रानुसार पात्रता प्रमाणपत्र Institute login मधून भरावे व विभागीय कार्यालयात आवश्यक कागदपत्रे व शुल्क जमा करुन पात्रता प्रमाणपत्र निश्चित करुन घ्यावे. तद्नंतर निश्चित केलेल्या पात्रता प्रमाणपत्रानुसार विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज उपलब्ध करण्यात येतील.

२. संस्थांनी अभ्यासक्रम निहाय देण्यात आलेल्या Optional / Elective विषयाबाबत माहिती घेऊन त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जात नमूद केलेले Optional / Elective विषय तपासावे व परीक्षा अर्ज निश्चित करावे.

३. ज्या विद्यार्थ्यांची या पूर्वीच्या परीक्षेदरम्यानचे गैरप्रकार / कॉपीकेस बाबतची शिक्षा पूर्ण झाली आहे अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Institute Login मध्ये उपलब्ध असतील. संस्थेने संबंधीत विद्यार्थ्यांचे मागील परीक्षेचे निकाल Gazette नुसार तपासून त्याप्रमाणे अनुत्तीर्ण विषय नमूद करुन परीक्षा अर्ज निश्चित करावा.

४. ज्या विद्यार्थ्यांनी C/E या स्कीममध्ये एकवेळ संधीचा (OTO) लाभ घेऊन अंतिम वर्षातील पाचवे व सहावे सत्राचे सत्रकर्म पूर्ण केले आहे व असे विद्यार्थी हिवाळी २०२० परीक्षाकरीता अंतिम वर्षासाठी पात्र आहेत. अशा विद्यार्थ्यांचे पाचवे व सहावे सत्राचे परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्याकरीता प्राचार्यांनी संस्थेच्या लेटर हेडवर "विद्यार्थ्यांनी मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीनुसार अंतिम वर्षातील पाचवे व सहावे सत्राचे सत्रकर्म पूर्ण केले आहे व त्यांचे अंतर्गत गुण (TW व SW) संबंधित विभागास जतन केले आहे" असे प्रमाणित करुन Message System द्वारे मंडळास कळविणे आवश्यक आहे. तद्नंतरच एकवेळ संधीचा (OTO) लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज उपलब्ध होतील.

५. संस्थांनी विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरतांना काही अडचणी आल्यास त्याबाबतचे मार्गदर्शन करावे. तसेच परीक्षा अर्जासंदर्भात संस्थेस काही अडचणी आल्यास मंडळाशी संपर्क करण्याकरीता Message System चा वापर करावा.

६. पात्र विद्यार्थ्यांनी भरलेले सर्व परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क तपासून Institute Login मधून परीक्षा अर्ज निश्चित करावेत व विभागीय कार्यालयात परीक्षा शुल्क जमा करुन पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज निश्चित करुन घ्यावे.

**७. संस्थांनी परीक्षा शुल्क भरलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज निश्चित केल्याची आणि एकही पात्र विद्यार्थी परीक्षा अर्ज भरण्यापासून वंचित राहिला नसल्याबाबतचे हमीपत्र (Undertaking) तसेच परीक्षा अर्ज भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी तपासून अभ्यासक्रमनिहाय संस्थेत नोंद ठेवल्याबाबतचे प्रमाणपत्र विभागीय कार्यालयास सादर करावे.**

**क) हिवाळी-२०२० परीक्षा अर्ज निश्चित करण्यासंदर्भात विभागीय कार्यालयाकरीता सूचना.**

१. पात्रता प्रमाणपत्राकरीता आवश्यक असलेली कागदपत्रे तपासून त्यानुसार शुल्क घेऊन पात्रता प्रमाणपत्रे निश्चित करावीत.

२. कोव्हिड-१९ प्रदुर्भाव विचारात घेता आपल्या विभागातील सर्व संस्थांना परीक्षा अर्ज निश्चित करण्याकरीता योग्य त्या सुचना द्याव्या व संस्थांना परीक्षा अर्जाबाबत काही अडचणी असल्यास मार्गदर्शन करावे.

३. बंद असलेल्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी हिवाळी-२०२० परिक्षा अर्ज निश्चित करतांना विद्यार्थ्यांचे मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी यांची नोंद विभागीय कार्यालयात ठेवावी व परीक्षासंदर्भात विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

४. संस्थांनी सादर केलेले हमीपत्र, प्रमाणपत्र व परीक्षा शुल्क इत्यादी तपासून मंडळाने नमूद केलेल्या कालावधीतच सर्व संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षाअर्ज निश्चित करावेत.

**विशेष सूचना :**

शैक्षणिक वेळापत्रक २०२०-२१ मध्ये नमूद दिनांकानुसार संस्थांनी विभागीय कार्यालयाने दिलेल्या सुचनेनुसार हिवाळी-२०२० परीक्षेचे अर्ज विभागीय कार्यालयांत निश्चित करावेत. तसेच नमूद कालावधीत संस्थेकडून हिवाळी-२०२० परीक्षेचे अर्ज निश्चित न झाल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी संस्था जबाबदार राहील, याची नोंद घावी.

01/01/2021

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

**प्रत माहीतीसाठी:**

मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

**प्रत माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:**

१. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद.

२. प्राचार्य, मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.